3	(Loan Code No. 00005654)/ Panvel Branch), Mohammed Shamim Shaikh (Borrower) Yasmin Mohammed Samin Khatun (Co-Borrower)	All the Part & Parcel of Property- Flat No. 203, 2Nd Floor, Arihant Anaika Bldg, Bldg. No. F2, Near Amar Dham, Near Amar Dham, Koyalanvele, Panvel, Navi Mumbai Maharashtra :- 410208	14.06.2021 for Rs 3043442 /- Rupees Thirty Lakhs Forty Three Thousand Four Hundred Forty Two and Paise Zero Only	12.08.2022
4	(Loan Code No. 00000501)/ Pen Branch), Mohd Salim Mohd Ali Khan (Borrower) Sehar Bano Mohd Khan (Co-Borrower)	All the Part & Parcel of Property- Flat No. 203, 2Nd Floor, Arihant Anaika Bldg, Bldg. No. F2, Near Amar Dham, Near Amar Dham, Koyalanvele, Panvel, Navi Mumbai Maharashtra :- 410208	17.05.2021 for Rs 2347634 /-Rupees Twenty Three Lakhs Forty Seven Thousand Six Hundred Thirty Four and Paise Zero Only	13.08.2022
5	(Loan Code No. 00001313)/ Navi Mumbai Branch), Rajdhar Barku Sonawane (Borrower) Vinod Rajdhar Sonawane (Co-Borrower)	All the Part & Parcel of Property- House No.187 A, At Village Kamarli, Gat No. 60, Taluka Pen, Raigad Maharashtra 402107	24.10.2013 for Rs 241767 /- Rupees Two Lakhs Forty One Thousand Seven Hundred Sixty Seven and Paise Zero Only	13.08.2022
6	(Loan Code No. 00000066)/ Pen Branch), Sanvalaram Sujanaram Choudhry (Borrower) Kanchan Savalaram Choudhary (Co-Borrower)	All the Part & Parcel of Property- Balaji Apt , Viiekhol , Mangaon. Raigad Raigad Raigad Maharashtra :- 402108	16.06.2021 for Rs 1532995 /- Rupees Fifteen Lakhs Thirty Two Thousand Nine Hundred Ninety Five and Paise Zero Only	13.08.2022
7	(Loan Code No. 00009493)/ Kalyan Branch), Skumar Premchand Kanojia (Borrower) Ranjana Skumar Kanojiya (Co-Borrower)	All the Part & Parcel of Property- Flat No.301,3rd Floor, C Wing, Payal Apartment Chsl, Near Ganpati Mandir, Midc Shahad Water Plant Road, Mharalgaon, Taluka Kalyan Thane Maharashtra :- 421301	22.11.2021 for Rs 1135992 /- Rupees Eleven Lakhs Thirty Five Thousand Nine Hundred Ninety Two and Paise Zero Only	13.08.2022
8	(Loan Code No. 00009388)/ Thane Branch), Suntech Engineering Works (Borrower) Rajesh Pal (Co-Borrower)	All the Part & Parcel of Property- M_MACHINE_NAME :- CNC Lathe Machine with fanuc OI TF Controller Basic Machine with standard Score of Suppy AP_MODEL_NO :- VX 200 Super AP_INVOICE_NO :- GST 202	10.08.2021 for Rs 934006 /- Rupees Nine Lakhs Thirty Four Thousand Six and Paise Zero Only	12.08.2022
9	(Loan Code No. 00000125)/ Bhandup Branch), Shantabai Jaywant Khedekar (Borrower) Ashish Jaywant Khedekar (Co-Borrower)	All the Part & Parcel of Property- Flat No.366, Ground Floor, Mahim Macchimar Nagar Bldg No.10 Chsl, Next To Raheja Hospital, Mahim West Mumbai Suburban Maharashtra :- 400016	18.08.2021 for Rs 1056463 /- Rupees Ten Lakhs Fifty Six Thousand Four Hundred Sixty Three and Paise Zero Only	16.08.2022
10	(Loan Code No. 00003867)/ Thane Branch), Trupti Dilip Kubde (Borrower)	All the Part & Parcel of Property- Flat No.402,4th Floor, Wing C, Bldg No.77, Vayu, Karrm Residency, Sec-3,Dhasai Shahapur Kinhavali Road,Shahapur, Thane-421601	25.06.2019 for Rs 1058066 /- Rupees Ten Lakhs Fifty Eight Thousand Sixty Six and Paise Zero Only	16.08.2022
11	(Loan Code No. 00000632)/ Khopoli Branch), Anita Balaram Deshmukh (Borrower) Ketan Chandrakant Sawant (Co-Borrower)	All the Part & Parcel of Property- Flat No. 304, 3rd Floor, A- Wing, Nirmal Bhakti, Lowjee, Near Lowjee Village, Khopoli, Raigad,Raigad-410203	16.06.2020 for Rs 358160 /- Rupees Three Lakhs Fifty Eight Thousand One Hundred Sixty and Paise Zero Only	16.08.2022
12	(Loan Code No. 00001977)/ Vashi Branch), Srinivasa Sanjeeva Shetty (Borrower) Jyoti Srinivasa Shetty (Co-Borrower)	All the Part & Parcel of Property- Flat No.11,2Nd Floor, Piyush Chs, Opp Vimal Ceramic, Shastri Nagar, Village Bhanwaj Village Bhanwaj Khopoli Raigad Maharashtra :- 410203	16.06.2021 for Rs 1036904 /- Rupees Ten Lakhs Thirty Six Thousand Nine Hundred Four and Paise Zero Only	16.08.2022
13	(Loan Code No. 00000228)/ Palghar Branch), Sushma Mahendra Ushir (Borrower) Mahendra Ashok Ushir (Co-Borrower)	All the Part & Parcel of Property- Flat No.306, 3rd Floor, Radhe Krishna Dham Apartment, Near Kalubai Mandir Off Neral Kasheli Road Neral, Taluka - Karjat, Raigad Maharashtra - 410202	19.12.2019 for Rs 1184283 /- Rupees Eleven Lakhs Eighty Four Thousand Two Hundred Eighty Three and Paise Zero Only	16.08.2022

Date : 18-08-2022
Place: Mumbai

Sd/-
(Authorised Officer)
Piramal Capital & Housing Finance Limited
Formerly Known as Dewan Housing Finance Corporation Limited

देश-विदेश

'भारतात येऊन प्रश्न विचारा', थायलंडमधील भारतीयाला एस जयशंकर यांचं उत्तर

नवी दिल्ली, दि. १७ (वृत्तसंस्था) : भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर सध्या थायलंड दौऱ्यावर आहेत. दरम्यान, त्यांनी बँकॉक याठिकाणी पार पडलेल्या एका कार्यक्रमात भारत-थायलंड संबंधाबाबत विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तरं दिली आहेत. यावेळी त्यांनी एका भारतीय तरुणानं विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देणं टाळलं आहे. जेव्हा मी परदेशात असतो, तेव्हा भारतीय राजकारणावर कोणतंही भाष्य करत नाही. त्यामुळे तुम्ही भारतात येऊन हा प्रश्न मला विचारा, याचं उत्तर द्यायला मला आनंद होईल, असं जयशंकर म्हणाले. प्रश्न विचारणारा तरुण हा मूळचा तामिळनाडू राज्यातील असून तो थायलंडमध्ये राहतो. संबंधित कार्यक्रमात त्यानं तामिळनाडूच्या संदर्भाने केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यात सुरू असलेल्या राजकीय संघर्षाबाबत प्रश्न विचारला होता. यावेळी जयशंकर यांनी संबंधित प्रश्नावर थेट उत्तर देणं टाळलं आहे. 'मी जेव्हा परदेश दौऱ्यावर असतो, तेव्हा भारतीय राजकारणाबाबत भाष्य करत नाही. तुम्ही भारतात येऊन हा प्रश्न विचारा, मला याचं उत्तर देण्यास खूप आनंद होईल,' असं जयशंकर म्हणाले. जयशंकर यांनी संबंधित कार्यक्रमात भारत-थायलंड संबंध, आत्मनिर्भर भारत, भारतातील व्यावसायिक सुलभता, भारतीय विद्यापीठे, रशिया युक्रेन युद्ध सुरू असतानाही भारताने रशियाकडून तेल खरेदी करणं, अशा विविध प्रश्नांना उत्तरं दिली आहेत.

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या सुरक्षेत त्रुटी, मोदी सरकारने घेतला मोठा निर्णय

नवी दिल्ली, दि. १७ (वृत्तसंस्था) : राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या तीन कमांडोंना केंद्राने हटवलं आहे. इंडिया टुडेने सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, फेब्रुवारी महिन्यात अजित डोवाल यांच्या सुरक्षेत त्रुटी आढळल्याने केंद्राने हा निर्णय घेतला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, डोवाल यांच्या व्हीआयपी सुरक्षेशी संबंधित उपमहानिरीक्षक (डीआयजी) आणि कमांडंट यांची बदली करण्यात आली आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये एका व्यक्तीने अजित डोवाल यांच्या निवासस्थानी घुसण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी सुरक्षारक्षकांनी त्याला रोखलं होतं आणि नंतर दिल्ली पोलिसांनी बेड्या ठोकल्या होत्या. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लाल रंगाच्या एसयुव्हीमधून एका व्यक्तीने कडक सुरक्षाव्यवस्था असणाऱ्या अजित डोवाल यांच्या दिल्लीमधील निवासस्थानी घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला होता. कार रोखण्यात आली होती आल्यानतंर अजित डोवाल यांच्या सुरक्षेची जबाबदारी असणाऱ्या सीआयएसएफने कार रोखत त्या व्यक्तीला ताब्यात घेतलं होतं. या व्यक्तीचं नाव शंतनू रेड्डी होतं. आपल्या शरिरात चिप बसवलेली असून, बाहेरुन त्याद्वारे नियंत्रण केलं जात असल्याचा त्याचा दावा होता. एमआरआय चाचणी केली असता शरिरात अशी कोणतीही चिप बसवली नसल्याचं समोर आलं होतं. बंगळुरुची असणाऱ्या या व्यक्तीचं मानसिक संतुलन योग्य नव्हतं. नोएडामधून ही कार भाड्याने घेण्यात आल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं होतं. अजित डोवाल यांना झेड प्लस दर्जाची सुरक्षा आहे. घटना घडली तेव्हा अजित डोवाल आपल्या निवासस्थानी होते.

दोन वर्षांनंतर सीएए-एनआरसी कायद्याविरोधात पुन्हा निदर्शने सुरू

नवी दिल्ली, दि. १७ (वृत्तसंस्था) : जवळपास दोन वर्षांच्या कालावधीनंतर वादग्रस्त ठरलेल्या नागरिकत्व दुरुस्ती कायदा विरोधातील आसाममध्ये पुन्हा निदर्शने सुरू झाली आहे. ऑल आसाम स्टुडंट्स युनियन (आसु) ने सीएए विरोधात निषेध सभा आयोजित केली होती. यावेळी पोलिसांनी विद्यार्थ्यांना रॅली काढण्यापासून रोखण्यात आले. आसामध्ये दोन वर्षांपूर्वी सीएए विरोधात निदर्शने करण्यात येत होती. मात्र, कोविडमुळे ही आंदोलनं थांबवण्यात आली होती. आता येत्या काही दिवसांत पुन्हा सीएए विरोधातील आंदोलन करण्यात येणार असल्याचे ऑल आसाम स्टुडंट्स युनियनच्यावतीने सांगण्यात आले आहे. आसाममधील बेकायदेशीर स्थलांतरितांच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढणे, आसाम कराराची अंमलबजावणी करणे, दहशतवाद्यांशी सामना करणे, सर्व ईशान्येकडील राज्यांमधून सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा मागे घेणे तसेच आसाम, मेघालय आणि त्रिपुरामध्ये अंतर्गत-रेखा परमिट नियम लागू करणे. यासह इतर प्रमुख मुद्यांवर हा विरोध होतो आहे. ११ डिसेंबर रोजी २०१९ रोजी संसदेत नागरिकत्व दुरुस्ती कायदा पारित करण्यात आला होता. या कायद्यानुसार ३१ डिसेंबर २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी भारतात प्रवेश केलेल्या अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तानमधील हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन असलेल्या अवैध स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देण्यात येणार आहे. मात्र, या कायद्यात मुस्लिमांचा समावेश नसल्याने वाद निर्माण झाला आहे.

'चीनच्या ५ युद्धनौका आणि १७ लढाऊ विमानं', तैवानच्या संरक्षण मंत्रालयाचा गंभीर दावा; हल्ल्यासाठी चीन सज्ज?

नवी दिल्ली, दि. १७ (वृत्तसंस्था) : गेल्या अनेक महिन्यांपासून चीन आणि तैवानमधील संबंध प्रचंड ताणले गेले असून चीनने जाहीररीत्या तैवानवर दावा सांगितला आहे. त्यात अमेरिकन संसद सदस्यांच्या तैवान दौऱ्यावरून चीनने आगपाखड केलेली असतानाच आता तैवानच्या हवाई हद्दीमध्ये चीनी लढाऊ विमानं घिरट्या घालू लागली आहेत. खुद्द चीनने देखील या वृत्ताला दुजोरा दिलेला असतानाच आता तैवानच्या संरक्षणमंत्र्यांनी देशाच्या हवाई सीमेवर चीनी हवाई दलाच्या हालचालींची सविस्तर माहिती दिली आहे. तसेच, अमेरिकी संसद सदस्यांच्या दौऱ्यानंतर या हालचाली वाढल्याचं देखील तैवानकडून सांगितलं जात आहे. त्यामुळे चीन तैवानवर हल्ला करण्यासाठी सज्ज असल्याचं बोललं जात आहे. मंगळवारी चीनकडून तैवानच्या हवाई हद्दीजवळ वायुदलाच्या कवायती केल्याचा दावा करण्यात आला होता. त्यानंतर आता तैवानच्या संरक्षण मंत्रालयाकडून त्यावर भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. 'तैवानच्या हद्दीमध्ये चीनी लष्कराच्या हालचालींची नोंद करण्यता आली आहे. तैवानच्या लष्कराकडून बिजिंगच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आलं आहे', असं तैवानच्या संरक्षण मंत्रालयाकडून करण्यात आलेल्या ट्वीटमध्ये म्हटलं आहे. '५ चीनी युद्धनौका आणि १७ लढाऊ विमाने तैवानच्या आसपासच्या भागामध्ये असल्याची नोंद करण्यात आली आहे. तैवानच्या लष्कराकडून परिस्थितीचा आढावा घेतला जात आहे', असं देखील देशाच्या संरक्षण विभागाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. गेल्या अनेक वर्षांपासून चीनकडून तैवानवर दावा सांगितला जात आहे. १९४९मध्ये चीनमध्ये झालेल्या अंतर्गत यादवीनंतर चीनच्या मुख्य भूमीवर चीनमधील साम्यवादी शासनानं सरकार स्थापन केलं, तर विरोधी पक्षाच्या गटानं तैवानमध्ये बस्तान बसवलं. मात्र, २०१९पासून चीननं सातत्याने तैवानच्या हद्दीमध्ये लष्करी हालचाली सुरू केल्या. तैवान हा चीनचाच भाग आहे, असं म्हणत तैवानला चीनमध्ये सामील होण्यासाठी कम्युनिस्ट सरकारकडून दबाव टाकला जाऊ लागला.

घाऊक महागाई दर पाच महिन्यांच्या तळाला

नवी दिल्ली, दि. १७ (वृत्तसंस्था) : अन्नधान्य व उत्पादित वस्तूंच्या किमती रोडावल्याने घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर सरलेल्या जुलै महिन्यात १३.९३ टक्के असा पाच महिन्यांच्या तळात विसावल्याचे मंगळवारी प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीने स्पष्ट केले. तरी एप्रिल २०२१ पासून सलग १६ व्या महिन्यात घाऊक महागाई दर दोन अंकी स्तरावर कायम आहे. महागाईच्या आगडोंबात सर्वसामान्यांची होरपळीचा प्रत्यय मे महिन्यातील घाऊक महागाई दराने विक्रमी पातळी गाठून दिला होता. मे महिन्यात घाऊक महागाई दर १५.८८ टक्क्यांवर पोहोचला होता आणि २०१२ नंतरची त्याची ही उच्चांकी पातळी होती. त्या तुलनेत जून आणि जुलैमध्येदेखील या दराने उसंत घेतल्याचे ताज्या आकडेवारीतून दिसत असले, तरी गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत त्यात वाढ झाली आहे.

जुलै २०२१ मध्ये महागाई दर ११.५७ टक्के पातळीवर होता. सलग दुसऱ्या महिन्यात घाऊक महागाई दरात घसरण झाल्याने दिलासा मिळाला आहे. जुलैमध्ये खाद्यपदार्थांची किंमतवाढीची पातळी जूनमधील १४.३९ टक्क्यांवरून कमी होत १०.७७ टक्क्यांवर आली. तर सरलेल्या महिन्यात भाज्यांच्या किंमतवाढीत लक्षणीय घट होऊन ती १८.२५ टक्क्यांवर आली आहे, जी आधीच्या महिन्यात ५६.७५ टक्क्यांवर होती. ऊर्जा व इंधन क्षेत्रातील महागाई मात्र ४३.७५ टक्क्यमंपर्यंत वाढली आहे.

फ्लिपकार्टला एक लाखांचा दंड

निकृष्ट प्रेशर कुकर विक्री केल्याने सीसीपीएची कारवाई

ग्राहकांना परत करावी लागणार रक्कम

नवी दिल्ली, दि. १७ (वृत्तसंस्था) : केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने ई-कॉमर्स कंपनी फ्लिपकार्टला एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. हा दंड फ्लिपकार्टला निकृष्ट दर्जाच्या (गुणवत्तेच्या मानकांची पूर्तता न करणारे) घरगुती प्रेशर कुकर विक्री केल्याबद्दल लावण्यात आला आहे. CCPA नुसार, फ्लिपकार्टने त्याच्या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर अशा प्रकारचे प्रेशर कुकर विक्री करुन १ लाख ८४ हजार २६३ रुपये कमावले आहेत.

सीसीपीएच्या मुख्य आयुक्त निधी खरे यांनी सांगितले की, फ्लिपकार्टला त्यांच्या प्लॅटफॉर्मवर निकृष्ट प्रेशर कुकर विकल्याबद्दल आणि ग्राहकांच्या हक्कांचे उल्लंघन केल्याबद्दल एक लाखांचा दंड

ठोठावण्यात आला आहे. कंपन्यांनी विक्री केलेले ५९८ प्रेशर कुकर परत मागवून ग्राहकांचे पैसे परत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय कंपनीला ४५ दिवसांत अनुपालन अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

ई-कॉमर्स कंपनी ॲमेझॉनला या महिन्याच्या सुरुवातीला प्रेशर कुकर विकल्याबद्दल १ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. जे गुणवत्ता मानकांची पूर्तता करत नाहीत. याशिवाय, यावर्षी मार्चमध्ये, CCPA ने ई-कॉमर्स कंपनी पेटीएम मॉल आणि स्नॅपडीलला सेट मानदंडांकडे दुर्लक्ष करून प्रेशर कुकर विकल्याबद्दल प्रत्येकी १ लाख रुपयांचा दंड ठोठावला.

कंपन्यांनी विकलेले हे प्रेशर कुकर परत मागवून ग्राहकांनी भरलेली रक्कम परत करण्याचे आदेश देण्यात आले होते. सरकारने प्रेशर कुकरसाठी गुणवत्ता नियंत्रण आदेश जारी केला आहे. ज्यामध्ये ग्राहकांना इजा आणि नुकसान होण्याचा धोका टाळण्यासाठी मानक चिन्ह वापरण्यास सांगितले आहे. IS २३४७:२०१७ मानकांनुसार घरगुती प्रेशर कुकर तयार केलेले असावे.

यंदा भारतीय कंपन्या १० टक्के पगारवाढ करणार

नोकरी बदलणे, सोडून देणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढली

आयटी क्षेत्रात ६५.५ टक्के रोजगार वाढेल

नवी दिल्ली, दि. १७ (वृत्तसंस्था) : भारतीय कंपन्या २०२२-२३ मध्ये कर्मचाऱ्यांच्या पगारात १० टक्के वाढ करू शकतात. संपूर्ण आशिया-पॅसिफिक प्रदेशातील ही सर्वोच्च पगारवाढ असणार आहे. कंपन्यांना असा निर्णय घेण्याची वेळ का आली तर हल्ली नोकरी बदलून किंवा सोडून जाणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे. जागतिक सल्लागार कंपनी विलिस टॉवर्स वॉटसनच्या वेतन बजेट योजनेच्या अहवालात याबाबत नोंद करण्यात आली आहे. हा अहवाल मंगळवारी प्रसिद्ध झाला.

यावर्षी ३१ मार्च रोजी गेल्या आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये, भारतीय कंपन्यांनी ९.५ टक्के पगारवाढ दिली होती. भारतातील निम्म्याहून अधिक (५८ टक्के) नियोक्त्यांनी चालू आर्थिक वर्षासाठी गेल्या वर्षीच्या तुलनेत जास्त पगारवाढीचे बजेट केले आहे. दरम्यान, यापैकी एक चतुर्थांश (२४.४ टक्के) असे आहेत. ज्यांनी बजेटमध्ये कोणतेही बदल केले नाहीत. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे २०२१-२२ च्या तुलनेत केवळ ५.४% लोकांनी बजेट कमी केले आहे. हा अहवाल एप्रिल आणि मे २०२२ मध्ये १६८ देशांमध्ये केलेल्या सर्वेक्षणावर आधारित आहे. भारतातील ५९० कंपन्यांशी बोलून यात आढावा घेण्यात आलेला आहे.

चीनमधील कंपन्या ६ टक्के, हाँगकाँगमध्ये ४ टक्के आणि सिंगापूरमध्ये ४ टक्क्यापर्यंत वेतनवाढ घेऊ शकतात. भारतातील सुमारे ४२ टक्के कंपन्यांनी पुढील १२ महिन्यांत सकारात्मक व्यवसाय कमाईचा अंदाज वर्तवला आहे. तर केवळ ७.२ टक्क्यांनी नकारात्मक दृष्टीकोन असल्याचे सांगितले आहे. भारतातील कर्मचाऱ्यांचे उत्स्फूर्तपणे काम सोडण्याचे प्रमाण १५.१ टक्के आहे. हाँगकाँगनंतर आशिया-पॅसिफिक प्रदेशात ते सर्वाधिक आहे.

गुडफेलो वृद्धांचा एकटेपणा दूर करणार

शांतनू नायडूंच्या स्टार्टअपला रतन टाटांची साथ

मुंबई, दि. १७ (प्रतिनिधी) : ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांनी ज्येष्ठ नागरिकांचा एकटेपणा दूर करण्यासाठी स्टार्टअप गुडफेलोमध्ये गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. मात्र, गुंतवणुकीची रक्कम जाहीर करण्यात आलेली नाही. टाटा समूहातून निवृत्त झाल्यानंतर रतन टाटा हे स्टार्टअप्सचे कायम समर्थक राहीले आहेत. आतापर्यंत ५० हून अधिक स्टार्टअप कंपन्यांमध्ये टाटा समूहाकडून गुंतवणूक करण्यात आलेली आहे. गुडफेलो या नवीन स्टार्टअपची स्थापना शांतनु नायडू यांनी केली आहे. कॉर्नेल युनिव्हर्सिटीतून पदवीधर झालेले २५ वर्षीय नायडू सद्या टाटा कार्यालयात महाव्यवस्थापक आहेत आणि २०१८ पासून रतन टाटा यांचे सहाय्यक देखील आहेत.

रतन टाटा हे ८४ वर्षांचे आहेत. ते स्वतः अविवाहीत आहेत. ते म्हणाले की, 'तुम्ही कोणाशी तरी वेळ घालवण्याच्या आशेने एकटे राहत नाही तोपर्यंत एकटे राहणे काय असते हे तुम्हाला माहीत नाही.' चांगल्या स्वभावाचा जोडीदार शोधणे देखील एक आव्हान आहे. नायडू यांनी टाटा यांना बॉस, मार्गदर्शक आणि मित्र म्हणून संबोधित केले. शंतनू म्हणाले, जगात १५ दशलक्ष वृद्ध लोक आहेत. जे पुर्णपणे एकटे आहेत. स्टार्टअप गुडफेलो तरुण पदवीधरांना सहकारी ज्येष्ठ नागरिक म्हणून 'काम' करण्यासाठी नियुक्त करते. सामान्यतः भागीदार आठवड्यातून तीन वेळा क्लायंटला भेट देतो. चार तास राहतो. एक महिन्याची मोफत सेवा दिल्यानंतर गुडफेलोज पाच हजार रूपये मासिक शुल्क आकारतात. गुडफेलोची ही सदस्यता आधारित सेवा सध्या मुंबईत आहे. येथे २० वृद्धांकडे हे काम करित आहेत. मात्र लवकरच ते बंगळुरूसह अन्य शहरांमध्ये ही सेवा कार्यान्वित करणार आहेत. सुमारे १४० कोटी लोकसंख्येच्या देशात प्रत्येक दुसरा भारतीय २५ वर्षपिक्षा कमी वयाचा आहे. परंतु १.५ दशलक्षाहून अधिक वृद्ध भारतीय एकटे राहतात. एकतर कुटुंब नसतात किंवा परदेशात मुले नसतात. अशा परिस्थितीत या वृद्धांना मानसिक आणि शारीरिक आरोग्याचा आव्हानांना सामोरे जावे लागते. गुडफेलोचे बिझनेस मॉडेल हे फ्रीमियम सबस्क्रिप्शन मॉडेल आहे.

सूर्या रोशनीने ऊर्जा-कार्यक्षम वॉटर हिटर्सची नवी श्रेणी लॉन्च केली

मुंबई, दि. १७ (प्रतिनिधी) : सूर्या रोशनी या भारतातील आघाडीच्या फास्ट मूव्हिंग इलेक्ट्रिकल गूड्स (एफेमईजी) कंपनीने नुकतेच ३ लिटरपासून ५० लिटरपर्यंच्या स्टोरेज क्षमतांमधील ऊर्जा-कार्यक्षम वॉटर हिटर्सच्या त्यांच्या नवीन मान्सून व विंटर रेडी सिरीजच्या लाँचची घोषणा केली आहे. सर्व हिटर्स मॉडेल्स क्यूबिक्स, स्पीडी आणि इन्स्टा प्रो उच्च गंजरोधक रचनेसह डिझाइन करण्यात आले आहेत आणि या मॉडेल्समध्ये फुली लोडेड ऑफरिंग्ज आणि पहिल्यांदाच मोफत इन्स्टॉलेशन व ॲक्सेसरीज सपोर्ट आहे.

सुरक्षितता, आरोग्य व आंघोळीचा आनंद यावर लक्ष केंद्रित करण्यासोबत आधुनिक व समकालीन बाथरूमच्या सजावट आणि आतील भागांना उत्तम प्रकारे पूरक करण्यासाठी नवीन सिरीज डिझाइन करण्यात आली आहे. नवीन सिरीज विभक्त कुटुंबांच्या विशिष्ट आवश्यकता आणि त्यांच्या जागेच्या मर्यादांचे देखील निराकरण करते.

सूर्या रोशनीच्या कंझ्युमर ड्यूरेबल्सचे व्यवसाय प्रमुख विशाल अखौरी म्हणाले, 'आम्हाला वॉटर हिटर्सचे तीन नवीन उदयोन्मुख मॉडेल्स लाँच करण्याचा आनंद होत आहे, जे आमच्या ब्रॅण्डची उत्तम डिझाइन व उच्च दर्जाप्रती स्थिर कटिबद्धतेला दाखवतात.

जाहीर नोटीस

सर्व संबधितांना याद्वारे जाहीर करतो की **श्रीमती. नाजमीन रियाज खान** माझ्याकडुन माझे **फ्लॅट नं. 302** बिल्डींग नं. **10 लकी अपार्टमेंट सोसायटी लकी बिल्डींग सि. एच. एस. एल. टी. डी. लकी हॉटेल जवळ गोरेगावं मुलुंड लिंक रोड इरानी वाडी गोरेगावं पुर्व मुंबई 400063.** या फ्लॅट चे नोंदनी क्र. BDR2-7437-2004 दिनांक 18/08/2004 विक्ररीकरारनामा हरवले आहे.
तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध वा अधिकार असल्यास तो त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाले दिवसापासून **14** दिवसांचे आत निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या खालील पत्यावर लेखी कागदोपत्री कळवावा. अन्यथा तसा कोणाचाही प्रकारचा हक्क, हितसंबंध वा अधिकार नाही असे समजून वा असल्यास तो सोडून देण्यात आली आहे असे समजून सदर मिळकतीच्या टायटल बरोबर आहे.
सही/-
बी. आर. मिश्रा
वकील उच्च न्यायालय
दिनांक: १८/०८/२०२२ **खरीदाराचे वकील**
ऑफ: शॉप नं. ११, समर्पण, बिहाइंड हैप्पी होम्स कनाकिया, मीरा रोड (पूर्व) ठाणे - ४०११०७.

जाहीर सूचना

माझे अशील **मे. नवकर इस्टेट ॲन्ड होम्स प्रा. लि.** (प्रमोटर्स) हे जी **श्रीम. शकुंतलादेवी जीतलाल गुप्ता व ओमप्रकाश रामसंजीवन गुप्ता (खारेदीदार)** यांच्याद्वारे फ्लॅट क्र. ८०४ च्या हक्कांची पडताळणी करण्यास इच्छुक आहेत ज्यांनी तोंडी अहवालाने नवकर होम्स टाऊशीप एलएलपीच्या प्रस्तावित प्रकल्पामधील फ्लॅट क्र. ५१० बुक केला होता व त्यांनी गाव जुचंद्र, तालूका वसई, जिल्हा पालघर येथील डॉन बोस्को हाय स्कूलजवळ डी१ बिल्डींग नवकर ब्लॉसम म्हणून ज्ञात न्यु प्रोजेक्ट धारक फ्लॅट क्र. ८०४, ८ वा मजला, प्रोजेक्ट नवकर सिटी फेज-१ पार्ट-५ म्हणून ज्ञात त्यांच्या फ्लॅटचे स्थानांतरण केले होते त्या संबंधातील त्यांच्याकडून त्यांची पावती व बुकिंग फॉर्म्स गहाळ झाले आहेत. आता ते सदर **विनोदकुमार रंगलाल गुप्ता व पुष्पा विनोद गुप्ता** यांच्याकडून सदर वरील बुक फ्लॅटमधील सर्व त्यांचे हक्क, अधिकार, हितसंबंध व शेअर्सचे हस्तांतरण करण्यास इच्छुक आहेत व आता प्रमोटर्स यांना सदरचे हस्तांतरण करण्यास इच्छुक आहेत. त्यामुळे, मी माझे अशील यांच्या वतीने याद्वारे कोणतेही दावे असल्यास सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून **१५ दिवसांच्या** आत संबंधित दस्तावेजांसह दावे/ आक्षेप/ तिसरे पक्ष दावे मागवीत आहेत, जर कोणाही व्यक्तीस **वकील पी. एस. शामदासनी ॲन्ड असोसिएट्स यांना पत्ता, १५४/२, ओसवाल ओरनेट सीएचएस, जेसल पार्क, भाईंदर (पू), जिल्हा ठाणे** येथे व/वा **मे. नवकर इस्टेट ॲन्ड होम्स प्रा. लि.** चे संचालक यांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून **१५ दिवसांच्या** आत पुराव्यांसह सूचित करावे. जर सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारेखेच्या नंतर कोणतेही दावे प्राप्त न झाल्यास वरील सदर फ्लॅटचे हक्क करार स्पष्ट व बाजारभाव व सर्व अडथळ्यांपासून मुक्त असलेले गृहित धरले जाईल व **विनोदकुमार रंगलाल गुप्ता व पुष्पा विनोद गुप्ता** यांच्या नावे त्यांचे हक्क हस्तांतरित करतील. दावे त्यानंतर गृहित धरले जाणार नाहीत.
पी. एस. शामदासनी ॲन्ड असोसिएट्स करिता
सही/-
पुष्पा शामदासनी
दि. १८.०८.२०२२ **(वकील उच्च न्यायालय)**

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, **श्री. शकीर खान हे फ्लॅट क्र. २०८, दुसरा मजला, दामूल सीएचएस लि., भाईदया नगर बी, नवघर रोड, भाईंदर (पू), जिल्हा ठाणे ४०१ १०५** येथील मालमत्तेचे मालक आहेत. १. बिल्डर यांनी सदर फ्लॅट जागा **श्रीम. अल्का मारूती जॉंजल (खारेदीदार) यांनी विक्री केली होती २. श्रीम. अल्का मारूती जॉंजल (विक्रेता) यांनी सदर फ्लॅट जागा श्री. राधेश्याम एस. शर्मा (खारेदीदार)** यांना विक्री दि. २५.०५.१९९८ करिताच्या करार अंतर्गत नोंदणीकरणा अंतर्गत घोषणा दस्तावेज **TNN4-2887/2008 dated 27.03.2008** अंतर्गत विक्री केली होती, **३. श्री. राधेश्याम एस. शर्मा (हस्तांतरक)** यांनी सदर फ्लॅट जागा **श्री. प्रभू लाल सेन (हस्तांतरिती)** यांना विक्रीच्या करार अंतर्गत दि. २२.०१.२०१५ रोजी नोंदणीकरण करार दि. २२.०१.२०१५ च्या दस्तावेज क्र. **TNN7-588/2015** अंतर्गत विक्री केली होती. ४. श्री. प्रभू लाल सेन (हस्तांतरक) यांनी सदर फ्लॅट जागा श्री. शकीर खान (हस्तांतरिती) यांना विक्री करार दि. २७.०४.२०१७ अंतर्गत नोंदणीकरण दि. २७.०४.२०१७ अनुसार दस्तावेज क्र. **TNN7-5711/2017** अंतर्गत विक्री केली होती. पहिले मूळ करार बिल्डर व **श्रीम. अल्का मारूती जॉंजल यांच्या दरम्यान व दुसरे मूळ करार श्रीम. अल्का मारूती जॉंजल (विक्रेता) व श्री. राधेश्याम एस. शर्मा (खारेदीदार)** यांच्या दरम्यान वरील सदर फ्लॅट जागेच्या संबंधात अंमलात आणले होते ते करार गहाळ/हरवले आहेत. श्री. शकीर खान हे सदर फ्लॅट जागा इच्छुक खरेदीदार यांना विक्री करण्यास इच्छुक आहेत.
सर्व बँक, वित्तीय संस्था, व्यक्ती आदींनी याद्वारे माझे अशील वा मला वा त्यांचे काउन्सेल वा यांना सदर दावे, आक्षेप यांच्या संबंधात कोणतेही दावे असल्यास कोणाही व्यक्तीस सदर संबंधात हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास तसेच अर्जदार मालमत्तेमध्ये विक्री, गहाण, भेट, धारणाधिकार, वारसा आदी काही असल्यास सदर तारखेपासून योग्य पुरावे यांच्यासह १४ दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा कोणतेही आक्षेप वा दावे गृहित धरले जाणार नाहीत.
डी. के. पांडे
दि. १८.०८.२०२२ **वकील उच्च न्यायालय**
पत्ता : फ्लॅट क्र. ११७, शिव दर्शन अपार्टमेंट, फायर ब्रिगेड जवळ, नालासोपारा पूर्व, जिल्हा पालघर ४०१ २०९.

जाहीर नोटीस

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, माझे अशील **श्री. गणेश रामू आदमाने आणि सौ. साधना गणेश आदमाने,** रूम नं. 209, दुसरा मजला, ए-विंग, प्रशांत कुटीर म्हणून ओळखला जाणारा प्रकल्प, प्रशांत सेवा संस्था म्हणून ओळखली जाणारी संस्था, गाव-तुळींज, नालासोपारा पूर्व, ता. वसई, जिल्हा-पालघर ४०१२०९., सर्व्हे नं. 59, हिस्सा नं. २, व सर्व्हे नं. ५८, हिसा क्र. १ (भाग), प्लॉट क्र. ४., सदरील रूम **श्री. गणेश रामू आदमाने आणि सौ. साधना गणेश आदमाने,** हे **श्री. जयंतीलाल गणपतीलाल दर्जी,** कडून रूम खरेदी करत आहेत.
श्री जयंतीलाल गणपतीलाल दर्जी, हे या मालमत्तेचे मूळ मालक आहेत.
म्हणून आम्ही याद्वारे दावा किंवा आक्षेप आमंत्रित करतो की कोणत्याही व्यक्तीने या रूमच्या विरोधात किंवा त्याच्या विरोधात किंवा त्यावर कोणताही दावा किंवा आक्षेप असल्यास त्यांनी प्रकाशन दिनांकापासून **14 दिवसांच्या** आत कळवावे.
श्री.डी.एस.तिवारी
दिनांक :- १८/०८/२०२२ **(उच्च न्यायालय वकील)**
पत्ता-दुकान नं. १९ आकांक्षा टॉवर, रेल्वे स्टेशनजवळ, नालासोपारा पूर्व

जाहीर सूचना

सूचना देण्यात येते की, माझे अशील श्री. महेश्वर सिंह यांनी विक्रेता **१. श्री. भालचंद्र लक्ष्मण पाटील, २. श्री. महेश भाईचंद्र पाटील** राहणार पत्ता शिरगाव-रायपाडा, गाडगा बस स्टॉप, विरार (पूर्व) पालघर यांच्याकडून खालील अनुसूचीमध्ये विवरणीत जमिनीचा खुला प्लॉट एकूण क्षेत्रफळ मोजमापित ९२५.१० गुंठा पत्ता गाव काशिद कोपर, तालूका वसई, जिल्हा पालघर, व्हीव्हीएमसी यांच्या मयदितील मालमत्ता खरेदी करण्याचे मान्य केले आहे.
अनुसूची :

सर्व्हे क्र.	क्षेत्रफळ	आकार	पो. ख.	फे. फा
११६	१.७३.३०	७.०९	०.०३.००	१३३१
१३३/४	०.४४.३०	६.००	०.००.२०	१७०२
१२८	१.११.५०	५.८७	-	१३३१
१२७/१	१.३५.००	५.५०	०.०२.००	१७०२
११५	०.६३.७०	२.६२	-	१३३१
११४	१.३४.६०	६.००	-	१३३१
११२	१.५९.१०	७.१२	-	१३३१
१११	०.९८.४०	४.४४	-	१३३१

सर्व व्यक्तींना/ व्यक्तीस सदर जमिन मालमत्तेच्या संबंधात कोणतेही हक्क, अधिकार, दावे वा हितसंबंध असल्यास तसेच कोणत्याही स्वरूपातील विक्री, अदलाबदल, भेट, गहाण, प्रभार, भाडेकरार, धारणाधिकार वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे सदर लेखी स्वरूपात अधोहस्ताक्षरित यांना सदर तारखेपासून १५ दिवसांच्या आत दस्तावेज पुरावे यांच्यासह सूचित करावे अन्यथा सदर दावे, काही असल्यास ते विचारात घेतले जाणार नाहीत व अधित्यागीत व परित्यागीत मानले जातील.
सतिष एस. चौंबे
दि. १८.०८.२०२२ **वकील उच्च न्यायालय**
बी/१२३, ओस्वाल ओर्नेट बिल्डींग क्र. २, जेसल पार्क, भाईंदर (पू), जिल्हा ठाणे ४०१ १०५.

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, आम्ही **श्री. वरूण जगदीश तुलशियन,** दिवंगत **श्री. जगदीश महावीरप्रसाद तुलशियन** यांचे कायदेशीर वारस म्हणून **फ्लॅट क्र. १४०२, १४ वा मजला,** बिल्डींग क्र. २१, डीबी ओझोन म्हणून ज्ञात, गाव महाजनवाडी, ऑफ वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, दहिसर टोल नाका, मीरा रोड पूर्व, ठाणे ४०१ १०७ या मालमत्तेच्या संबंधात हक्कांची पडताळणी करत आहोत जी **श्रीम. अर्चना राजेश भगत, श्रीम. श्वेता विकास केडिया व श्रीम. निधी संदिप दिदवानिया** (दिवंगत श्री. जगदीश महावीरप्रसाद तुलशियन यांचे अन्य कायदशीर वारस म्हणून क्षमतेमधील सदर ताब्यात) यांच्या ताब्यात होती. कोणाही व्यक्तीस वरील संदर्भित जागेच्या वा भागाच्या संबंधात कोणतेही दावे असल्यास तसेच विक्री, अदलाबदल, गहाण, प्रभार, भेट, देखभाल, वारसा, ताबा, भाडेकरार, वहिवाट, धारणाधिकार, तारणगहाण, हक्कांचे हस्तांतरण वा लाभार्थी हितसंबंध यांच्या संबंधात कोणतेही न्यास, प्रीस्क्रीप्शन हक्क वा प्री-एम्पशन वा कोणतेही करार वा अन्य निराकरण वा कोणतेही करार वा अवार्ड वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे संबंधित